महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) अन्वये प्रसिध्द केलेल्या पुणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील ट्रान्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेंट (टी.ओ.डी) बाबतचा विनियम लागु करण्याकरिता कलम १५४ अन्वये निदेश...

## महाराष्ट्र शासन

**नगर विकास विभाग**

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१८/९५०/प्र.क्र.१५८/१९/नवि-१३,**

**दिनांक :३०/०६/२०२०**

**प्रस्तावना :-**

शासनाच्या नगर विकास विभागाने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेला) चे कलम ३१(१) अन्वये, पुणे महानगरपालिकेची विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली -२०१७ (यापुढे "उक्त विकास नियंत्रण नियमावली" असे उल्लेखिलेली) अधिसूचना क्र.टिपीएस-१८१५/२०९/प्र.क्र.६९/१५/वि.यो.पुणे-मंजुरी/नवि-१३, दि.०५/०१/२०१७अन्वये मंजूर असून त्यानुसार उक्त विकास नियंत्रण नियमावली पुणे महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीसाठी देखील लागु करण्यात आली आहे;

उक्त विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विनियम क्र.२४.८ मध्ये ट्रान्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेन्ट (टी.ओ.डी) बाबतचा विनियम समाविष्ट असून (यापुढे "उक्त विनियम" असे उल्लेखिलेला) पुणे महानगरपालिकेने (यापुढे "उक्त महानगरपालिका" असे उल्लेखिलेली) उक्त विनियमाची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी उक्त विनियमामध्ये काही सुधारणा करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर केला आहे. उक्त महानगरपालिकेने उक्त विनियमासंदर्भात सादर केलेला प्रस्ताव विचारात घेऊन व आवश्यक त्या चौकशीनंतर उक्त विकास नियंत्रण नियमावलीमध्ये उक्त विनियमाची अंमलबजावणी योग्यरितीने होऊन ट्रान्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेन्ट मागील उद्देश साध्य होणेसाठी तसेच लोक हिताचे दृष्टीने विचार करुन उक्त विनियमामध्ये फेरबदल करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) अन्वयेची सूचना क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.८५/१८/नवि-१३, दि.०८/०३/२०१९ नुसार प्रसिध्द केली आहे.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

Scanned with CamScanner

पुणे शहरात मेट्रो प्रकल्पाचे काम सुरु झालेले असल्याने ट्रान्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेन्ट बाबतच्या विनियमाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या मूळ व वाढीव हद्दीसाठी लागु असलेल्या नियमावलीतील टी.ओ.डी.बाबतचा विनियम, त्यामध्ये शासनाने दि.०८/०३/२०१९ रोजीच्या सूचनेद्वारे प्रसिध्द केलेल्या सुधारणांसह आणि त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलांसह समाविष्ट करण्यासाठी उक्त नियमावलीमध्ये परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केल्याप्रमाणे फेरबदल करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) अन्वयेची सूचना क्र.टिपीएस-१८१८/९५०/प्र.क्र.१५८/१९/नवि-१३, दि.३०/०६/२०२० नुसार प्रसिध्द केली आहे. सदर विनियम तातडीने लागु करणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाले आहे. सबब याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये पुणे महानगरपालिकेस पुढीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत :-

**' निदेश '**

" पुणे महानगरपालिकेच्या मुळ आणि वाढीव हद्दीसाठी लागू असणा-या उक्त विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र.२४.८ मधील ट्रान्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेन्ट संदर्भातील विनियम शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) अन्वयेची सूचना क्र.टिपीएस-१८१८/९५०/प्र.क्र.१५८/१९/नवि-१३; दि.३०/०६/२०२० नुसार प्रसिध्द केलेला आहे. सदर विनियम तातडीने लागु करण्यात येत आहे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(किशोर गोखले)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI 32

**प्रति :-**

आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.

**प्रत :-**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे,

२) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

३) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.

Scanned with CamScanner